GREENLAWNS HIGH SCHOOL
FINAL EXAMINATION YEAR 2020

SUBJECT : MARATHI — CLASS : VIII
TIME : 2 HOURS — MARKS : 80

---

सूचना - १) विभाग 'अ' व 'क' मधील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहा.
२) विभाग 'ब' मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा.

## विभाग – अ

### गद्य

प्रश्न १. अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा:- (१०)

**कृती -१- आकलन कृती**

१) आकृती पूर्ण करा

१) सकाळ झाल्यावर ईशान व त्याच्या मित्रांनी केलेली कामे }

| |
|---|
| |
| |

२) हवाईदलाच्या जवानांना पहाडावर दिसलेले लोक }

| |
|---|
| |
| |

सकाळ झाल्यावर ईशानने व त्याच्या मित्रांनी आसपासच्या जंगलातून लाकडे गोळा करुन आणली व त्यांना आग लावली. त्यातून खूप धूर झाला. हा हवाईदलाच्या हेलिकॉप्टरसाठी एक संकेत होता. योगायोगाने एक हेलिकॉप्टर धूर पाहून खाली आले व पहाडाच्या वर घिरटया घालू लागले. हवाईदलाच्या जवानांनी पहाडावर अडकलेल्या यात्रेकरूंना, ईशान व त्याच्या साथीदारांना पाहिले. ईशान व त्याच्या साथीदारांनी यात्रेकरुंना हेलिकॉप्टरपर्यत पोहोचवायला हवाईदलाच्या जवानांना मदत केली.

इवाईदलाच्या हेलिकॉप्टरने सर्वांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले होते. हवाईदलाच्या अधिकाऱ्यांना जेव्हा ईशान व त्याच्या साथीदारांचे बहादुरीचे कार्य समजले, तेव्हा त्यांची सर्वांची प्रशंसा केली. एवढेच नव्हे, तर त्यांनी या मुलांना वीरपदक मिळावे म्हणून राष्ट्रपतींकडे शिफारस केली.

तिकडे ईशान आणि त्याचे साथीदार पहाडावर झालेल्या दुर्घटनेनंतर सुरक्षित घरी पोहोचले, तेव्हा ते फार खूश झाले होते. गिर्यारोहणाचा हा अनुभव त्यांच्यासाठी कायम स्मरणात राहणारा होता.

**कृती** – २. एका वाक्यात उत्तरे दया:- (३)

१) खूप धूर झाल्यामुळे काय झाले ?

२) ईशान व त्याचे साथीदार कधी खूश झाले ?

३) हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना मुलांच्या बहादुरीचे कार्य समजले तेव्हा त्यांनी काय केले ?

**कृति** -३ व्याकरण कृती :- (२)

१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा:-

१) संकेत २) बहादुरी

२) खालील शब्दांचे वचन बदला:-

१) कार्य २) शिफारस

**कृति** – ४ स्वमत :- तुम्हाला जाणवलेली ईशानची गुणवैशिष्टये तुमच्या शब्दांत लिहा: (२)

प्रश्न १. आ) खालील उताऱ्याच्या आधोर दिलेल्या सूचनेनुसार कृती करा:- (१०)

**कृती** १. आकलन कृती – आकृती पूर्ण करा:- (२)

१) भिंतीवरील तसबिरीतील जनावर { ☐ ☐ ☐ / ☐ ☐ ☐ }

२) मुक्या प्राण्यांनी यांना आवाहन केलंय } → ☐ → ☐ (२)

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. हे आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळया जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का ?

माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुक्या प्राण्यांची केलेलं ते आवाहन होतं. मला आत कुठंतरी हालवून सोडतं. आता मी कार्यालयात पाऊल टाकते. समोरच्या कपाटावर उदी रंगाचा एक गलेलठ्ठ बोका मजेत आपल्या मिशा साफ करत बसला आहे. मला बघताच तो कपाटावरुन उडी मारतो आणि साहेबांच्या टेबलावर येऊन बसतो.

इस्पितळ बघण्यासाठी मी आले आहे. असं मी त्या साहेबांना सांगते. बोक्याचं डोकं कुरवाळत ते माझं ऐकून घेतात आणि लगेच मला परवानगी देऊन टाकतात. इतकंच नाही, तर मला सारं इस्पितळ नीट दाखवण्यासाठी भरत नावाचा एक छोटा चुणचुणीत मुलगाही ते माझ्याबरोबर देतात.

**कृति** (२) एका वाक्यात उत्तरे लिहा:- (२)

१) लेखिका कोणते इस्पितळ बघायला गेल्या ?

२) लेखिकेला कार्यालयाच्या कपाटावर काय दिसले ?

**कृति** – (३) आकृति पूर्ण करा:- (१)

चुणचुणीत मुलगा → [ ] → त्याचे काम → [ ]

कृति – ४ १) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा:- (१)

१) परवानगी  २) चुणचुणीत

२) खालील शब्दांचे लिंग बदला :- (१)

१) मांजर -  २) साहेब –

**कृति ५. स्वमत-**

१) आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हाला आम्ही हवे आहोत का ? या ओळीचा तुम्हाला अवगत असलेला अर्थ तुमच्या शब्दात लिहा:- (२)

प्रश्न २ क) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा:- (८)

**कृति -१- आकृत्या पूर्ण करा:-** (२)

१) येथे झुळूक स्वैर झुकते { [ ] [ ] } → [ ] → [ ]

२) सानुल्या झुळूकेच्या प्रवासाचे स्वरुप } → [ ] → [ ] → [ ] ; [ ] (२)

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओठ मन तिकडे स्वैर झुकावे
कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाडयापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट
लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी दयावा

कृति – २) परिणाम लिहा:- (२)

१) कवी छोटीशी, मंद झुळूक बनला- ——————————————————

२) झुळूकेनें कलिकेला स्पर्श केला- ——————————————————

कृति - ३) 'झुळकेची परोपकारी वृत्ती तुमच्या शब्दात लिहा:- (२)

प्रश्न २. ख) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (८)

कृति - १. आकलन कृती- आकृतिबंध पूर्ण करा:- (३)

१) अभंगातील झाडे → [ ] → [ ] → [ ]

२) एक/ दोन शब्दांत उत्तरे लिहा:-

१) चंदनाच्या स्पर्शाने सुगंधित होते → [ ] → [ ]

२) हे जन संत दर्शनाने पावन होतात → [ ]

चंदनाच्या संगे बोरीया बाभळी।
हेकळी टाकळी चंदनाची।।१।।
संताचिया संगे अभाविक जन।
तयाच्या दर्शनें तेचि होती।।२।।
चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा।
नाहीं तरी भार वाहावा खरा ऐसा।।३।।

कृती – २) आकलन कृती:- (३)

१) एका वाक्यात उत्तरे दया

१) कोणाच्या सहवासात परमार्थ साधावा ?

२) अभंग कोणी लिहिला आहे ?

३) आपले जीवन कोणास भार होवू नये ?

कृती - ३) स्वमत:- वरील अभंगाचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा:- (२)

व्याकरण

विभाग –ब

नाव – ——————————————— हजेरी क्रमांक ——————-

**सूचना – खालील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहाः-**

प्रश्न ३. च) खालील वाक्यातील शब्दांच्या जाती ओळखाः- (३)

१) इतका मोठा बंगला त्यांनी कधीच पाहिला नव्हताः

——————————————————————————————

——————————————————————————————

छ) खालील वाक्यातील अधोरेखांकित अव्ययांचे प्रकार लिहा. (३)

१) दुकानदार चतुर होता परंतु मूर्ख नव्हता.

——————————————————————————————

२) अच्छा! तुमचा विचार तोच माझा.

——————————————————————————————

३) मुले मामाभोवती गोळा झाली.

——————————————————————————————

४)अजय त्यांच्याकडे एकटक पाहात होता.

——————————————————————————————

ज) खालील वाक्यांचे प्रकार लिहाः- (३)

१) राजश्रीने अभ्यास केला आणि नंतर ती खेळायला गेली.

——————————————————————————————

२) विनय गोव्याला गेला.

——————————————————————————————

३) आई घरी परत येईल तेव्हा तिला तुझा निरोप देईन.

——————————————————————————————

झ) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करुन वाक्ये पुन्हा लिहाः- (२)

१) मुलांनो तुम्ही आपले काम करा

——————————————————————————————

२)कसे लिहिले आहेत ते

ठ) लेखन नियमानुसार अचूक शब्द ओळखून लिहा:- (२)

१) मृत्यूमूखी/ मृत्युमुखी/ मृत्युमुखि/ मृत्यूमुखी ——————————————————

२) सरवांग/ संर्वांग/ सर्वांघ/ सर्वांग ——————————————————————

ड) गटात न बसणारा शब्द शोधून लिहा:- (२)

१) झुळझूळ, खळखळ, तळमळ, चिवचिव, किलबिल – ————————————————

२) दादा, अमित, भाऊ, अण्णा, भाई - ——————————————————————

प्रश्न ५. कंसातील शब्दसमूहाचा वाक्यातील रिकाम्या जागी वापर करुन वाक्ये पुन्हा लिहा:- (३)

(लक्ष वेधून घेणे, कानोसा घेणे, मनमानी करणे, काळजाला घरे पडणे)

१) हरीण दबक्या पावलांनी वाघाचा हालचालीचा ——————————————————-

२) घरासमोरील रांगोळी ने सर्वांचे ——————————————————————

३) गावातील भयानक पूरग्रस्त स्थिती पाहून लोकांचा – ————————————————

## विभाग – क
## उपयोजित लेखन

प्रश्न ६. खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा:- (६)

१) बाहेरगावी फिरुन आल्यावर त्या ठिकाणाचे वर्णन आपल्या मित्र/ मैत्रिणीला पत्राद्वारे कळवा.

किंवा

२) तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करुया!' हे १० दिवसाचे शिबिर आयोजित केले आहे त्यात तुमहाला सहभागी करुन घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

प्रश्न ७. घाटातून जाताना घ्यायची काळजी या विषयी सूचना फलक तयार करा. (५)

प्रश्न ८. खालील बातमीवाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:-

**आमिर खानचा होणारा पालिकेकडून सन्मान**

सोलापूर : लोक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी अभिनेता आमिर खान यांनी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरु केलेल्या पाणी बचतीच्या उपक्रमाची दखल घेत महापालिकेतर्फे मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्याचा प्रस्ताव २५ मे रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सभेत देण्यात आला आहे.

अभिनेता अमीर खानने पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यातील शेकडो गावांसाठी जलमित्र म्हणून नोंदणी सुरु केले आहे. या माध्यमातून सुरु केलेल्या वॉटरकप उपक्रमास मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सोलापूर जिल्हयातही गेली दोन वर्षे ही चळवळ वेगाने वाढत आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील नागरिकांना प्रोत्साहून देण्यासाठी आमिर खान यांनी पत्नीसह श्रमदानात सहभाग नोंदविला.

उत्तरे लिहा:-

१) सम्मान होणारी व्यक्ती व संस्थेचे नाव लिहा?

२) पाणी फाऊंडेशनच्या कार्याची उद्दिष्टे कोणती आहेत?

३) अमिर खान ने सुरु केलेला उपक्रम?

४) पाणी फाउंडेशनने सुरु केलेल्या नाव नोंदणीचा विषय?

५) अमिर खान ने कोणासह श्रमदानात भाग घेतला?

६) चळवळीचा वेग कोणत्या ठिकाणी वाढला?

प्रश्न ९ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा:- (८)

१) समुद्रकाठी एक संध्याकाळ २) मी पक्षी झालो तर

३) फाटक्या पुस्तकाची आत्मकथा ४) भ्रमणध्वनीचे फायदे व तोटे